# पाऊस

पावसाच्या धारा,
येती झरझरा
झाकळले नभ, वाहे सोसाटयाचा वारा.

रस्त्याने ओहळ
जाती खळखळ,
जागजागी खाचांमध्ये तुडंबले जळ.

ढगावर वीज,
झळके सतेज,
नर्तकीच आली गमे लेवूनिया साज.

झोंबे अंगा वारे,
काया थरथरे,
घरटयांत घुसुनिया बसली पाखरे.

हर्षलासे फार,
नाचे वनी मोर,
पानांतून हळू पाहे डोकावून खार.

पावसाच्या धारा,
डोईवरी मारा,
झाडांचिया तळी गुरे शोधिती निवारा.

नदीलाही पूर,
लोटला अपार,
फोंफावत धावे जणू नागीणच थोर.

- झाडांची पालवी
चित्ताला मोहवी
पानोपानी खुलतसे रंगदार छबी.

थांबला पाऊस,
उजळे आकाश
सूर्य येई ढगांतून, उधळी प्रकाश.

किरण कोवळे,
भूमीवरी आले,
सोनेरी त्या तेजामध्ये वास्तूजात खुले.

सुस्नात जाहली,
धरणी हासली,
वरुणाच्या कृपावर्षावाने सन्तोषली.

शान्ता शेळके
वर्षा

वर्षा हा शान्ताबाईंचा १९४८ मध्ये प्रसिध्द झालेला कवितासंग्रह. प्रा. रा.श्री. जोग यांनी त्या संग्रहाच्या प्रस्तावनेतच शान्ताबाईंची प्रतिभा, त्यांच्या कवितेतील सहजता, साधेपणा आणि आशयाची खोली याविषयी खूप कौतुक केले आहे. त्याचबरोबर ह्या कवितेपासून त्या दूर न जावोत अशी अपेक्षादेखील व्यक्त केली आहे.

शान्ताबाईंनी ही अपेक्षा पूर्ण केलीच पण त्याचबरोबर ललित लेख, कथा, कादंबऱ्या असे अनेक प्रकार समर्थपणे हाताळले. त्यांचा पाण्यावरच्या पाकळया हा जपानी हायकूंचा भावानुवाद फार सुरेख आहे. जरूर मिळवून वाचावा असा.

पाऊस ही तशी साधी-सरळ बाळबोध कविता आहे. बोरकरांच्या चित्रवीणेप्रमाणेच हे अगदी कमी शब्दात निर्मिलेले निसर्गचित्र आहे. डोळयासमोर चित्र अगदी हुबेहूब उभे करण्याची साध्या शब्दांची किमया मला खूप आवडली.

यानन्तरची कविता पावसानन्तर ही वर्षा ह्याच काव्यासंग्रहातली बरीच नन्तरची कविता ही पाऊस ह्याच कवितेचे continuation वाटते पण तिचा घाट आणि विचार एकदम निराळा.
तत्कालीन छंदोबध्द रचनेचा शान्ताबाईंनी कायमच भरपूर वापर केला होता. शार्दूलविक्रीडित वृत्तातले हे सुनीत अगदी classical कवितांची आठवण करून देते. त्यातही पहिल्या आणि चौथ्या ओळीचे यमक आणि दुसऱ्या व तिसऱ्या ओळचि यमक ही रचनेची विविधता छान वाटते.
पहिल्या बारा ओळीत निसर्गाचे वर्णन पण शेवटच्या दोन ओळीत एकदम वेगळाच विचार.

# पावसानन्तर

जोराने नुकतीच ही सडसडा येऊन गेली सर
गेले पांगुनि मेघ धूसर, दिसे आकाश आता निळे
झाला सूर्य पुन्हा प्रकाशित, पडे हे ऊनही कोवळे
रंगांच्या विविधच्छटा खुलुनिया शोभे किती अंबर!

झाले वृक्षहि तृप्त, शीतल, सुखे आनन्दुनी डोलती
ओलावून सुरेख हिर्वळ अतां ही हासते निर्भर
पाचूचेच जणू सतेज हिरवे ह भासती अंकुर
की ही गूढ मनोगते धरणिची बाहेर डोकावती?

सोनेरी मधुहास्य रम्य विलसे सृष्टीचिया आननी
वेगाने हलवीत पंख अपुले जाती नभी पाखरे
वाऱ्याच्या झुळका हळू बिलगता चैतन्य अंगी भरे
वाटे शीतलतेत देह निघतो आहे जणू न्हाऊनी

माझ्याही हृदयात मेघ असले येती कधी दाटुनी
ऐशी गोड प्रसन्नता परि तिथे येई न का मागुनी?

शान्ता शेळके
वर्षा